ISSN 2231-1629
Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
*January - June 2021- Vol. 10 No. 1*

# भारतीय अर्थव्यवस्थेत लघू व कुठीर उद्योगांचे महत्त्व

**प्रा. जगदीश रामभाऊजी वाटमोडे**
सहा. प्रा. अर्थशास्त्र विभाग
संताजी महाविद्यालय नागपूर

★★★

**सारांश** :— जगातील सर्वात वेगवान वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैंकी एक असणाऱ्या भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप हे मिश्र अर्थव्यवस्थेचे आहे. यात खाजगी व सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांना महत्त्व दिले जाते. अर्थ व्यवस्थेला स्थिरता व राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्यासाठी औद्योगीकरणासोबतच लघु व कुटीर उद्योगाचाही विचार करणे किंबहूना त्यास प्राधान्य देणे महत्त्वाचे आहे. भारतात प्राचीन काळापासुनच लघु व कुटीर उद्योगाचे विशेष स्थान आहे. रोजगार निर्मिती, आर्थिक विषमता कमी करणे, मोठया उद्योगास पूरक व मदतगार ठरून शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करून देशाचा संतूलित विकास साध्य करण्यास लघु व कुटीर उद्योग हे महत्त्वपुर्ण भूमिका पार पाडत असतात. या उद्योगाच्या महत्त्वामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून लघु व कुटीर उद्योगाचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यातच या उद्योगांचा पर्याप्त प्रमाणात विकास करण्याकरीता अनेक उपाय आज भारत सरकारच्यावतीने योजले जात आहे.

**बिजशब्द** :— अर्थव्यवस्था, लघु व कुटीर उद्योग, कृशी, सेवाक्षेत्र, राष्ट्रीय उत्पन्न, बाजारपेठ, रोजगार, भांडवल, लोकसंख्या, पांरपारीक कला, आर्थिक विषमता, आर्थिक विकास.

**प्रस्तवणा** :— देशाची प्रगती व आर्थिक विकास हया दोन्ही बाबी परस्पर पुरक अषाच आहेत. देशात आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरळीत असेल तर त्या देशातील लोकांना उच्च प्रकारचे जीवनमान प्रदान होत असते. आर्थिक विकास हा संबधीत देशाने स्वीकारलेल्या आर्थिक व्यवस्थेवर अवलंबुन असतो. देशात निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवांचे उत्पादन, अपभोग आणि वितरण इ. आर्थिक व्यवहाराचे नियमण व नियंत्रण करण्यासाठी स्वीकारलेल्या व्यवस्थेला अर्थव्यवस्था असे संबोधले जाते. अर्थव्यवस्थेची व्याख्या करतांना प्रा. ग्रेगरी ग्रॅासमन असे म्हणतात की, ''देशातील व्यक्ति, कुंटूबे, उद्योग संस्था, व्यवसाय संस्था यांच्या मार्फत उत्पादन, विभाजन, विनिमय व उपयोग या आर्थिक क्रिया पार पाडल्या जातात. हे देशातील विविध घटक व संस्थाना वळण लावण्यासाठी ज्या यंत्रणेचा वापर केला जातो, तिला अर्थव्यवस्था म्हणतात.''उत्पादन साधनांचे स्वामीत्व व व्यवस्थापन यांच्या आधारावर भांडवलशाही, समाजवादी व मिश्र अर्थव्यवस्था असे अर्थव्यवस्थेचे सर्वसाधारणतः तीन प्रकारात विभाजन केले जाते. त्यातच आर्थिक विकासाच्या दृष्टिने जगातील विविध अर्थव्यवस्थेचे वर्गिकरण हे अल्पविकसीत अर्थव्यवस्था व विकसनशील अर्थव्यवस्था आणि विकसीत अर्थव्यवस्था या प्रकारात करता येते. सार्वजनिक आणि खाजगी या दोन्ही क्षेत्राचे सहअस्तीत्व असणारी भारतीय अर्थव्यवस्था ही मीश्र स्वरूपाची असून ती विकसनशील अर्थव्यवस्था आहे. दरडोई उत्पान्नाची निम्न पातळी, शेती क्षेत्रावर अधिकाधिक भर, शेती उत्पादनाची निम्न पातळी, मूलभुत व जड उद्योगांचा मर्यादीत विकास, वेगाने वाढणारी लोकसंख्या, वाढती बेकारी, अत्याध ीक दारीद्रयता, आर्थिक विषमता, नैसर्गिक सांधनाचा अपुर्ण वापर उपयुक्त सामाजिक वातावरण व प्रेरणेचा अभाव इ. अषी भारतीय अर्थव्यवस्थेची मूलभूत वैशिष्टये आहेत.

**संशोधन पद्धती** :— प्रस्तूत शोध निबंधामध्ये वर्णनात्मक, विश्लेषणात्मक व ऐतिहासिक पद्धतीचा अवंलब करण्यात आलेला आहे.

**भारतीय अर्थव्यवस्था** :— भारतीय अर्थव्यवस्थेत भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेच्या वैशिष्टयांचा समन्वय साधला गेलेला आहे. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरुप हे मिश्र अर्थव्यवस्थेचे आहे यात खाजगी व सार्वजनीक अशा दोन्ही क्षेत्रांना महत्त्व दिले जाते. खाजगी क्षेत्रांना यात स्वांतत्र्य देण्यात आले असले तरी त्यांना सरकारी नियमांच्या चौकटीतच कार्य करावे लागते. अर्थातच खाजगी व सार्वजनिक ही दोन्ही क्षेत्रे परस्पर पुरक कार्य करतात. भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारली असल्यामुळे यात खाजगी व सार्वजनिक या दोन्ही क्षेत्रांना महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. यात समाजहिताची जाणीव ठेऊन जलद गतीने विकास साधण्याकरीता लोकांच्या सहभागीतेवर व स्वंयपूर्ततेवर भर देण्यात आलेला आहे. यासोबतच आत्याधिक आर्थिक विशमता निर्माण होऊ नये म्हणून आर्थिक केंद्रीकरणावर नियंत्रण प्रस्थापीत करण्याकरीता आर्थिक परवाना धोरणाचा अवलंब करण्यात आला आहे. भारतीय अर्थव्यवस्था ही जगातील सर्वात वेगात वाढणाऱ्या अर्थव्यवस्थेपैंकी एक असून यात भारताचा चीननंतर दुसरा क्रमांक लागतो. वैविध्यपूर्ण असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेत शेती, हस्तव्यवसाय, कापडगीरण्या, उद्योगधंदे, उत्पादन आणि विविध प्रकारच्या सेवा अशा अनेक बांबीचा त्यात समावेश होतो. शेती व त्यासंबधीत उद्योग व्यवसायावर अधिकाधीक आधारीत असलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेत आज सेवा क्षेत्राचाही झपाटयाने विकास व विस्तार होतांना दिसून येतो. उपलब्ध कुशल व अकुशल मनुष्यबळाद्वारे जगाला बाहयस्त्रोताच्या सेवा पुरविणारा देश म्हणून आज भारत देश व भारतीय अर्थव्यवस्थेचा नाव समोर येत आहे. भारतीय अर्थव्यवस्था अधिक गतीमान व विकसीत करण्याच्या कार्यात औषध निर्माण, जैव तंत्रज्ञान, दुरसंचार जहाज निर्माण विमान निर्माण तसेच पर्यटन इ. अशी महत्त्वपुर्ण क्षेत्रे आपली क्षमता सिध्द करीत आहेत.

जलद औद्योगीकरण म्हणजे जलद आर्थिक विकास ही संकल्पना रुढ होत असतांनाच भारतानेही समतोल व जलद आथिक विकास घडवून आणण्याकरीता कृशी क्षेत्राच्या विकासाबरोबरच औद्योगीक क्षेत्राच्या विकासावरही भर दिलेला आहे. भारतातील एकून उद्योगाची वर्गवारी संघटित उद्योग आणि असंघटीत उद्योग याप्राकरे केली जाते. लोखंड व पोलाद, सिमेंट पेट्रोलीयम, कापड, ताग, चहा, साखर अभीयांत्रीकी इ. उद्योगांचा संघटीत उद्योगामध्ये तर कुटीर उद्योग, लघु उद्योग, खादी व ग्रामउद्योग इ. चा असंघटित उद्योगामध्ये समावेश होतो. प्रचंड लोकसंख्या, मोठया प्रमाणात असणारी बेकारी तसेच गरीबी यावर मात करण्यासाठी संघटीत व असंघटीत उद्योगाच्या विकासावर भर देत असतांनाच भारताने जलद आर्थिक विकास साध्य करण्याकरिता औद्योगीकरणासही प्राधान्य दिले आहे.वाढत्या मागणीची पुर्तता षेती व इतर विषयांची प्रगती, भांडवल निर्मितीच्या वेगात वाढ करण्यासाठी तसेच अर्थव्यवस्थेला स्थिरता व एकूणच राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्यासाठी औद्योगीकरणाची कास धरणे महत्त्वाचे असले तरी लघू आणि कुटिर उद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेचे एक महत्त्वाचे अंग आहे. त्या अनूशंगानेच मोठया प्रमाणावर रोजगार निर्मिती, आर्थिक विषमता कमी करणे, मोठया उद्योगास साह्याक ठरुन शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करून देशाचा संतूलीत विकास साधण्याकरिता लघू व कुटीर उद्योगाचे स्थानही तेवढेच महत्त्वपुर्ण आहे. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने या उद्योगांचा पर्याप्त विकास करण्याकरिता अनेक उपाय योजलेले दिसतात.

**लघु व कुटीर उद्योग** :– स्वातंत्र्यपुर्व काळात भारतात ग्रामीण आणि लघु उद्योगांचा एक संयुक्त वर्ग होता. यात शेती ते हातमाग चंदनाच्या लाकडापासून वस्तू तयार करणारे कारखाने इ. चा समावेश यामध्ये केला जात होता. यापैकी बरेच उद्योग हे ग्रामीण होते. त्यातच ते भारतीय संस्कृतीचा व परंपरेचा एक महत्त्वाचे अंग होते. स्वातंत्र्याप्राप्तीनंतर पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी जी राष्ट्रीय नियोजन समिती नेमली होती त्या उपसमितीचे सचिव के. टी. शहा यांनी लघु उद्योग किंवा कुटीर उद्योगाची व्याख्या करतांना असे म्हटले आहे की, ''अशा उपक्रमाला किंवा प्रक्रियेच्या मालिकेला लघू उद्योग किंवा कूटीर उद्योग म्हणण्यात यावे की, जे एका कुशल कामगाराद्वारे स्वताच्या जबाबदारीवर संचालीत केले जातात आणि तो स्वतःच उत्पादीत मालाचे विपनन करतो आणि स्वतःच्या घरात काम करतो, आपल्या कुंटूंबातील सदस्याची मदत घेतो. अत्याधूनिक यंत्र सामुग्रीचा वापर करीत नाही हे लद्यु उद्योजक आपल्या शेजारील बाजार पेठेतच आपल्या वस्तूची विक्री करतात''

भारतामध्ये प्राचीन काळापासून लद्यु व कुटीर उद्योगांचे महत्त्वपुर्ण स्थान आहे. बऱ्याच वेळा लघु उद्योग, मृदा उद्योग, कुटिर उद्योग आणि खेडयात चालणारे उद्योग या सर्व संज्ञा एकाच अर्थाने वापरल्या जात असल्या तरी मात्र लघु उद्योग आणि कुटिर उद्योग यामध्ये फरक आहे. 1955 मध्ये भारत सरकारने लघु–उद्योगाची व्याख्या करतांना म्हटले आहे. की, ''ज्या उद्योग संस्थेत 50 पेक्षा कमी कामगार नोकरीवर असुन 100 पर्यत कामगार नोकरीवर ठेवण्याची क्षमता असते आणि जेथे विद्युत शक्तीचा वापर केला जात नाही. अशा उद्योग संस्था म्हणजे लघू उद्योग होत. तर ''ज्या उद्योग घटकात बहूसंख्य श्रमिक हे मालकाचे कुंटुबीयच असतात. ज्याच्या मालाला बहूशः स्थानिय वा मर्यादीतच बाजारपेठ असते व ज्यामध्ये भांडवल गुतंवणूक फारच कमी प्रमाणावर केली असते अशा उद्योगांना कुटीर उद्योग असे म्हणतात. कुटीर उद्योग व लघू उद्योग यांचे आर्थिक प्रश्न सारखेच असल्याने त्यांचा विचार बहूदा एकत्रच केला जातो.

कुटीर उद्योग हे लहान प्रमाणावर सामाण्यतः घराघरातून चालविले जाणारे उद्योग आहेत. लघूउद्योग हे कुटीरोद्योगापेक्षा थोडे मोठे असतात. भारतात शेती क्षेत्रानतंर रोजगार निर्माण करण्याच्या बाबतीत लघु उद्योगाचा क्रमांक लागतो. कुटीर उद्योग हे प्रामुख्याने शेतीशी सबंधीत असतात. कारागीर आपल्या हे प्रामुख्याने शेतीशी सबंधीत असतात. कारागीर आपल्या घर बसल्या हया उद्योगामध्ये हातभार लावू शकतात आणि याद्वारे अंशकालीन किंवा पुर्णकालीन रोजगार मिळविण्याचा प्रयत्न करतात. कुटीर उद्योग हे कुंटूबातील व्यक्तिच्या मदतीने केले जातात. यात लागणाऱ्या कामगारांची संख्या 10 पेक्षा जास्त नसते आणि भांडवल सुध्दा 5000 रूपयापेक्षा अधिक नसते. भारतीय कुटीर उद्योगात हातमाग, विडया वळणे, धोंगळया विणणे, गुळ तयार करणे, बांबु काम, कुंभार काम, चर्मोद्योग तेलघाण्या, नक्षीकाम, रेशमी वस्त्रे, रंगकाम सुतारकाम, मधमाशापालन इ. चा समावेश होत असतो. या उद्योगात स्थानिक कच्च्या माल व कुशलतेचा वापर केला जातो.

लघू उद्योगाची व्याख्या ही त्यामध्ये गुंतविलेले भांडवल व निर्माण होणारी रोजदारी यावरून केली जाते. तसेच भारतातील लघु उद्योगातील गुंतवणूकीची कमाल रक्कम ही प्राप्त परिस्थीतीनुसार वाढविण्यात येत असते. 1966 मध्ये उद्योगात 7.5 लाखापर्यंतची गुंतवणूक करणाऱ्या उद्योगाला लघू उद्योग ठरविण्यात आले तर 1997 मध्ये ही गुतंवणुकीची मर्यादा 3 कोटीपर्यत वाढविण्यात आली. अर्थात लघु उद्योग सुरू करण्याकरिता मोठया प्रमाणावर भांडवलाची गरज असते. हयात स्थानिक व बाहय कच्च्या माल तसेच आधुनिक यंत्रे व कुषलतेचा वापर केला जातो. लघु उद्योगात तयार होणाऱ्या वस्तूमध्ये कपडे तयार करणे, वाहणाचे सुटे भाग तयार करणे, प्लॅस्टीकच्या वस्तू तयार करणे, लहान अभियांत्रीकी वस्तू निर्माण करणे, लहान अभीयांत्रीकी वस्तू निर्माण करणे इ. चा समावेश होतो. लघू उद्योगाची बाजारपेठ ही विस्तारीत असल्यामुळे या उद्योगातील वस्तू निर्यात केल्या जातात. कुटीर उद्योग व लघु उद्योग यामधील फरक करतांना राज्य वित आयोगाने असे म्हटले आहे की, कुटीर उद्योग हे शेतीशी संलग्नीत असतात आणि ते ग्रामीण भागात अर्धवेळ व शहरात पुर्णवेळ काम पूरवितात. लघु उद्योगांचा विस्तार हा बहुतांश प्रमाणात शहराच्या ठिकाणी झालेला दिसतो. तसेच ते पुर्णपणे रोजगार उपलब्ध करून देतात. असे असले तरीही कच्च्या मालाचा तुटवडा, पर्याप्त भांडवल उपलब्ध नसणे, तांत्रिक सुधारणांचा अभाव तयार होणाऱ्या

वस्तुच्या विक्रीची समस्या, उत्पादनास येणारा अधिकचा खर्च इ. अषा समस्यांचा सामना हा लघु उद्योग व कुटिर उद्योग या दोहोंनाही करावा लागतो. त्या दृष्टिने भारत सरकारकडुनही हया उद्योगांच्या विकासा करीता नियोजणाच्या माध्यमातून बरेच प्रयत्न करण्यात येत असतात.

**भारतीय अर्थव्यवस्थेतील लघु व कुटीर उद्योगाचे महत्व** भारतीय अर्थव्यवस्थेत कुटीर व लघु उद्योगांना अंत्यत महत्त्वाचे स्थान आहे. भारताच्या आर्थिक, सामाजिक व औद्योगीक विकासात कुटीर उद्योग व लघु उद्योग यांनी महत्त्वपुर्ण वाटा उचलेला आहे. 18 व्या शतकाच्या मध्यापर्यंत लघु व कुटीर उद्योगाचे स्वरूप हे भारतामध्ये भरभराटीस आलेले होते. जगाच्या बाजारात भारतात निर्माण होणाऱ्या अनेक वस्तुंना, विषेशताः सुती व रेशीम कापड, शाली, गालीचे, जरी काम इत्यादिना विषेश मागणी होती. राष्ट्रपीता म. गांधी व दादाभाई नौरोजी यांनी भारतातील दारिद्रय दुर करण्यासाठी कुटीर उद्योगावरच भर दिला. आजही या उद्योगांचे भारताच्या आर्थिक विकासात तेवढेच महत्त्वाचे स्थान आहे हे पुढील प्रमाणे विशद करता येईल.

**1) कभी विकासास सहायक** :– केवळ शेती या व्यवसायावर अवलंबून असणारी कुंटुबे शेतीतून मिळणाऱ्या अल्प उत्पन्नामुळे कुटूबांची प्रगती तसेच शेतीतील सूधारणा करण्यास असमर्थ ठरतात. मात्र कुटीर व लघु उद्योग हे शेती सांभाळतानांच करता येत असल्यामूळे भारतीय षेतकऱ्याचे उत्पन्न वाढुन शेतीचा विकासही होण्यास मदत झाली आहे.

**2) पांरपारीक कला – कौशल्याचे जतण** :– स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात निर्माण होणाऱ्या वस्तु देशातच नव्हे तर विदेशातही ग्राहकांच्या पसंतीस उतरलेल्या होत्या. देशातील हे पांरपारीक कौशल्य हे या उद्योगामुळे सुरक्षित राहून याचा वारसा हा पुढेही चालविला जाणे शक्य होते. त्यामुळे अशा उद्योगामुळे पांरपारीक कला–कौशल्याचे एक प्रकारे जतन होते.

**3) रोजगार निर्मितीस मदत** :– देशातील वाढती बेरोजगारी दुर करण्यास लघु व कुटीर उद्योग हे मदतगार साबीत होत असतात. या उद्योगाद्वारे श्रमाचा अधिकाधीक वापर होत असल्यामूळे रोजगाराची पुर्तता ही या उद्योगातून साधता येते. त्यामूळे बेकारीची वाढती समस्या या उद्योगातून दुर होते.

**4) आर्थिक विषमता कमी होण्यास सहायक** :– आज भारतात एकीकडे श्रीमंतीचा थाट वाढतच असतांना दुसरीकडे आज गरिबी सुध्दा वाढत आहे. गरीब श्रीमंतातील ही आर्थिक दरी कमी करण्यास कुटीर उद्योग हे सहायक ठरतात. हया उद्योगाची सुरूवात ही कमी भांडवलात करता येणे शक्य असल्यामूळे गरीबांना अशा उद्योगाच्या माध्यमातून आपले उत्पन्न वाढण्यिास प्रोत्साहन मिळू शकते.

**5) शेतीवरील लोकसंख्येचा ताण कमी होण्यास सहायक** :– देशातील अनेक भागात कुटुबांतील सर्वच्या सर्वच सदस्य हे शेतातच काम करीत असल्यामूळे एकूणच शेतीवर लोकसंख्येचा ताण पडणे हे साहजिकच आहे. त्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत पाहीजे त्या प्रमाणात सुधारणा झालेली दिसत नाही. मात्र कुटीर उद्योगाच्या साहायाने ही परिस्थिती दुर केली जाऊ शकते. कारण असे उद्योग हे श्रमप्रधान व शेतीस सहायक तसेच हंगामी स्वरूपाचे असतात. याचाच परिणाम म्हणजे शेतीवरीत लोकसंख्येचा ताणही दुर करता येते.

**6) संतूलीत विकासास मदत** :– आर्थिक विकास साधत असंतांना तो जसा जलद असने गरजेचे असते तसेच तो संतुलीतही असने महत्त्वाचे आहे. या आर्थिक विकासात एखाद्या उद्योगाचा सोयी सवलतीमुळे अधिक विकास होऊन दुसऱ्या उद्योगांच्या सवलतीच्या अभावामुळे मागास असणे हे विकासाचे असंतुल निर्माण करते. याचा परिणाम हा आर्थिक विकासावर होत असते. मात्र लघु व कुटीर उद्योग हे सोयी सवलती न घेता सुरू करता येणे शक्य असल्यामूळे असे असंतूलन निर्माण होत नाही.

**7) मोठया उद्योगाच्या विकासाला गती** :– देशाचा जलद आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी निर्मित मोठया उद्योगासाठी आवश्यक असलेल्या कच्चा माल, यंत्रे अवजारे, इ. वस्तू हया लघु व कुटीर उद्योगातून निर्माण केले जाऊ शकते. अर्थात मोठया उद्योगाच्या गरजेची पुर्तता हे लघु व कुटीर उद्योग करीत असल्यामुळे असे उद्योग हे त्यांच्या विकासाला एक प्रकारची गती प्रदान करतात.

**निष्कर्श** :– आजच्या औद्योगीकरणच्या विज्ञान व तंत्रज्ञनाच्या युगातही लघू व कुटीर उद्योग हे रोजगार संधी निर्माण करण्यात आघाडीवर आहेत. या उद्योगातून उत्पादीत वस्तु व मालाच्या निर्यातीपासून बरेच परकीय चलन भारताला मिळले आहे. या उद्योगाच्या महत्त्वामुळेच स्वांतत्र्योत्तर काळात भारत सरकारने पंचवार्षीक योजनेच्या माध्यमातून कुटीर व लघू उद्योगांचा विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या उद्योगांची संख्याही वाढतांना दिसते. देशाच्या सतुंलीत आर्थिक विकास या उद्योगाच्या मदतीने साधला जात असल्यामुळे भारत सरकारकडून या उद्योगांच्या विकासाकरीता नियोजनाच्या माध्यमातुन प्रयत्न चालविले जातात. त्यामुळे लघू व कूटीर उद्योगांच्या महत्त्वाची सार्वत्रिकता दिसून येते.

***संदर्भ ग्रंथ सुची*** :–


*1) माहोरे रामदास, 2016, अर्थशास्त्राचे सिध्दांत, साई ज्योती पब्लीकेशन्स, नागपूर*

*2) डॉ. मुळे डी. व्ही., (प्रकाशक), सुक्ष्म लक्षी आर्थिक विश्लेषण, दुर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर.*

*3) डॉ. झामरे जी. एन., 2016, सुक्ष्म अर्थशास्त्रः भाग 2, पिंपळापूरे ॲंड पब्लीशर्स, नागपूर,*

*4) डॉ. मंडल, कृशी विकासाचे अर्थशास्त्र, पिंपळापुरे पब्लिशर्स नागपूर.*

*5) राणा के. सी. आणि वर्मा विशाल, समष्टी आर्थिक विश्लेषण, पब्लीशिंग कं. जालंदर, दिल्ली.*

*6) डॉ. काकडे जे. एम., डॉ. कावळे एस. एस., डॉ. कायरकर मनिश, 2019, भारतीय अर्थव्यवस्था, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर.*